अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

मुलगा आणि सुनेच्या मारहाणीत वृद्ध आई-वडील जखमी

सोलापूर/प्रतिनिधी

घरगुती वाद आणि पैशाच्या कारणावरून मुलगा,सुन आणि अन्य लोकांनी लाकडाने मारहाण करून चावा घेतल्याने वृद्ध आई-वडिल जखमी झाले. ही घटना डिग्गेवाडी (ता.अक्कलकोट) येथील शिवलाल नगरात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घडली. लताबाई गणपती राठोड (वय ६०) आणि त्यांचे पती गणपती तानू राठोड (वय ६५ रा.शिवलाल नगर,डिग्गेवाडी) अशी जखमी दांपत्याचे नावे आहेत. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून लक्ष्मी पवार (मुलगी) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घरगुती वादातून त्यांचा मुलगा रवी राठोड,यशोदा (सुन) आणिअन्य ४ ते ५ जणांनी मिळून लाकडाने मारहाण केली. तर सून यशोदा हिने सासुच्या हाताला चावा घेऊन जखमी केले. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

मुस्लिम समाजाचा महाआघाडीवर दबाव

शहर मध्यमधून मुस्लिम समाजाला उमेदवारी देण्याची मागणी

सोलापूर/प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातली शहर मध्यमधून मुस्लिम समाजालाच उमेदवारी देण्याची मागणी समाजातील नेत्यांनी केली आहे. समाजाला उमेदवारी देण्याची यावी, अन्यथा नाही मिळाल्यास मागणी दि.२० ऑक्टोबर रोजी सर्व पक्षीय नेत्यांचा मेळावा आयोजित करून अंतिम नाव जाहीर करणार असल्याचे मुस्लिम समाजाकडून सांगण्यात आले.

मुस्लिम समाजाच्या माजी नगरसेवकांनी तसेच नेत्यांनी गुरूवारी पत्रकार परिषदेत येत ही भूमिका येतली. या पत्रकार परिषदेस महापौर आरिफ शेख, तौफिक शेख, आरिफ शेख, रियाज हुंडेकरी,शौकत पठाण, कोमारो सय्यद व नुरोद्दीन मुल्ला, रियाज हुंडेकरी, शकील मौलवी, शिवा बाटलीवाला, मैनोद्दिन शेख उपस्थित होते.

बाबा मिस्त्रींना शहर मध्य मधून उमेदवारी मिळाल्यास आपण कोणता निर्णय घेणार हे विचारल्यावर बाबा मिस्त्रींना जाहीर पाठिंबा देत त्यांना निवडून आणण्यात येईल, असे सर्वांनी सांगितले.

सोलापूर : पत्रकार परिषदेत बोलताना तौफीक शेख, आरिफ शेख, शौकत पठाण व इतर.

आमच्या हक्काचा आमदार हवा : तौफिक

आम्हाला उमेदवारी न मिळाल्यास आम्हाला आमचा निर्णय घ्यावा लागेल. परिणामी गरज पडल्यास आम्ही बंडखोरी करू असा थेट इशारा तौफीक शेख दिला. आम्हाला आमचा हक्काचा आमदार पाहिजे. निर्णय न दिल्यास २० ऑक्टोबर रोजी ताज कंपाऊंड येथे मुस्लिम समाजाचा मेळावा घेऊन उमेदवार निश्चित करण्यात येईल असेहीही त्यांनी सांगितले.

विकासाच्या मुद्यावर महायुती लढणार; पदाधिकाऱ्यांनी मांडली भूमिका

सोलापूर/प्रतिनिधी

काम हीच महायुतीची ओळख आहे. महायुतीचे रिपोर्ट कार्ड सादर केले आहे. आगामी विधानसभा निवडणूक आम्ही विकासाच्या मुद्यावर लढणार आहोत, असे महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी शिवसेना सचिव संजय मशिलकर, भाजप अध्यक्ष नरेंद्र काळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष संतोष पवार, शिवसेना शहर प्रमुख मनोज शेजवाळ, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, भाजप नेते मनिष देशमुख, राष्ट्रवादी कार्याध्यक्ष जुबेर बागवान, अनंत जाधव, वैभव गंगणे, प्रमोद भोसले यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्यातील महायुती मधील पक्ष भाजप, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस, एकनाथ शिंदे गट शिवसेना आणि रयत क्रांती संघटना या पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली.

या पत्रकार परिषदेत लोकसभा निवडणुकीच्या पराभवावर प्रश्न उपस्थित केले, या निवडणुकीत महायुती एकत्र कुठे दिसली, राष्ट्रवादी बारामती आणि शिवसेनेचे कार्यकर्ते हे ठाण्यात प्रचाराला दिसले मग ही कसली महायुती? सोलापूर जिल्ह्यातील अकरा मतदारसंघ कसे ठरले याबद्दल प्रश्न उपस्थित झाले. सोलापूर जिल्ह्यातील अनेक कार्यकर्ते पक्ष सोडत आहेत याचा फटका बसेल का? असे प्रश्न विचारले असता कार्यकर्ते पक्ष सोडून जाणे दुःखद आहे, नेते गेले पण जनता महायुती सोबत आहे त्यामुळे फरक पडणार नाही असे उत्तर नरेंद्र काळे यांनी दिले.

सोलापूर : महायुतीच्या पत्रकार परिषदेत बोलताना नरेंद्र काळे, अनंत जाधप, संतोष पवार, मनिष देशमुख, अमोल शिंदे व इतर.

संक्षिप्त वृत्त

मोडनिंब : समूहगीत स्पर्धेतील सोलंकरवाडी शाळेतील मुलांसह शिक्षक दिसत आहेत.

गुणवत्ता विकास चाचणी स्पर्धेत सोलंकरवाडी शाळेचे यश

मोडनिंब : जिल्हा परिषदेच्या वतीने दरवर्षी घेण्यात येत असलेल्या विद्यार्थी विकास स्पर्धा अंतर्गत यावर्षी सोलंकरवाडी शाळेने समूह गीत गायन स्पर्धेत जगी घुमवा रे दुमदुमवा रे.. हे लहान गटात तर स्वतंत्रते स्वामिनी, सुयशदायिणी... या गीतासह मोठ्या गटात तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. या दोन्ही संघाची बार्शी येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धांमध्ये लहान गटात एकूण दहा संघ तर मोठ्या गटामध्ये नऊ संघांनी सहभाग घेतला होता. या दोन्ही गीतांसाठी संगीत शिक्षक अनिल रोकडे, स्वरवेध संगीत क्लासेस अरणचे प्रशिक्षक पवन पाटील व मुख्याध्यापक रामकृष्ण केदार यांनी संगीत साथ केली.यासाठी परमेश्वर सुरवसे,सोमनाथ शिंदे यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव, विस्तार अधिकारी शोभा लोंढे,केंद्रप्रमुख शिवराज ढाले, मुख्याध्यापक रामकृष्ण केदार यांनी अभिनंदन केले.

बॅनर काढताना पिकपवरून पडल्याने जखमी

सोलापूर : माणिक चौक येथील बुलबुले भांड्याच्या दुकानासमोर लिबर्टी शोरूमच्या बाजूस पिकअप क्रमांक (एम एच १३ ए एन ९४२७) या गाडीवर चढून बॅनर काढताना गाडीवरून पडल्याने शाहरुख शब्बीर पटेल (३०, रा. मुल्ला बाबा टेकडी, सिद्धेश्वर पेठ) हा जखमी झाला. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

अज्ञात कारणावरून कीटकनाशक द्रव्य प्राशन

राहत्या घरी पिकावर फवारणी करण्याचे कीटकनाशक द्रव्य प्राशन केल्याने परवीन इलियास पटेल (वय-३५ रा. तिऱ्हे, पिरटाकळी) यांना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

पायी चालत जाणाऱ्या महिलेस दुचाकीची धडक

सोलापूर ते तुळजापूर असे पायी चालत जाताना तुळजापूरच्या अलीकडे पाठीमागून आलेल्या दुचाकीचालकाने धडक दिल्याने संगीता अण्णा साळवे (वय-३०, रा. भिमाई नगर, विजापूर रोड) या जखमी झाल्या. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

मोहोळमधून यशवंत माने, करमाळ्यातून संजयमामांना संधी

बारामतीतून अजितदादाच

राष्ट्रवादीच्या संभाव्य ४१ उमेदवारांची यादी

मुंबई : महायुतीमध्येही विद्यमान आमदारांची जागा त्या त्या पक्षाला मिळणार आहे. त्यामुळे, संभाव्य उमेदवारांची नावे पुढे आली आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील ४१ संभाव्य उमेदवारांची यादी समोर आली आहे. सोलापूर जिल्ह्यातून मोहोळमधून यशवंत माने आणि करमाळ्यामधून संजयमामा शिंदे या दोन विद्यमान आमदारांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

अजित पवार हे निवडणूक लढणार की नाही, बारामतीमधून अजित पवार दुसरा उमेदवार देणार का, अशा चर्चा गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात सुरू होत्या. मात्र, अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे बारामतीमधूनच उमेदवार असतील, असेच दिसून येते. नवाब मलिक यांनाही शिवाजीनगर मानखुर्दमधून उमेदवारी देण्यात येणार आहे.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे ४१ संभाव्य उमेदवारः अजितदादा पवार - बारामती, छगन भुजबळ - येवला, हसन मुश्रीफ-कागल, धनंजय मुंडे - परळी ,नरहरी झिरवाळ - दिंडोरी, अनिल पाटील - अमळनेर, राजू कारेमोरे - तुमसर, मनोहर चंद्रीकापुरे - अर्जुनी मोरगाव, धर्मरावबाबा आत्राम - अहेरी, इंद्रनील नाईक - पुसद, चंद्रकांत नवघरे - वसमत नितीन पवार - कळवण, माणिकराव कोकाटे - सिन्नर, दिलीप बनकर - निफाड, सरोज अहिरे - देवळाली, दौलत दरोडा - शहापूर, अदिती तटकरे - श्रीवर्धन, संजय बनसोडे - उदगीर अतुल बेनके - जुन्नर, दिलीप वळसे पाटील - आंबेगाव, दिलीप मोहिते-खेड -आळंदी, दत्तात्रय भरणे - इंदापूर यशवंत माने - मोहोळ, सुनिल शेळके- मावळ, मकरंद पाटील - वाई, शेखर निकम- चिपळूण, अण्णा बनसोडे - पिंपरी, सुनिल टिंगरे - वडगाव शेरी, राजेश पाटील- चंदगड, चेतन तुपे - हडपसर, किरण लहामटे - अकोले, संजय शिंदे - करमाळा, देवेंद्र भुयार - मोर्शी, आशुतोष काळे - कोपरगाव संग्राम जगताप - अहमदनगर शहर, जयसिंह सोळंके - माजलगाव, बाबासाहेब पाटील - अहमदपूर, सना मलिक - अणुशक्तीनगर, नवाब मलिक -शिवाजीनगर मानखुर्द अमरावती शहर - सुलभा खोडके, इगतपुरी - हिरामण खोसकर.

नोकरी लावण्याचे आमिष; तरुणीस ३ लाखास गंडवले

अकलूज येथील घटना; एकावर गुन्हा

अकलूज : येथील एका २३ वर्षीय विवाहित तरुणीस नोकरी लावण्याचे आमिष दाखवून २ लाख ९५ हजाराची फसवून केल्याची घटना नुकतीच उघडकीस आली.याप्रकरणी अकलूजच्या पोलिसांनी मयूर जाधव धुके (रा.सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे . या संदर्भात पूजा प्रसन्न कदम (वय २३ रा. वसंत विहार पोलीस कॉलनी,अकलूज) यांनी नुकतीच पोलिसात फिर्याद दाखल केली.

मयूर जाधव धुके याने त्यांना सरकारी नोकरी लावतो अशी थाप मारून ऑक्टोबर २०२३ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत वेळोवेळी २ लाख ९५ हजार रुपये घेतले होते. त्यानंतर त्याने नोकरी लावली नाही. तसेच पैसे देखिल परत न देता फसवणूक केली.असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक साळुंखे करीत आहेत.

धाब्यावरून पडल्याने वृद्ध इसम बेशुद्ध

सोलापूर : घराच्या धाब्यावरून तोल जाऊन पडल्याने ८५ वर्षीय वृध्द ईसम जखमी होऊन बेशुद्ध झाले. ही घटना शहरातील न्यू बुधवार पेठेत असलेल्या महात्मा फुले चौकाजवळ गुरुवारी सायंकाळच्या सुमारात घडली. लक्ष्मण लिंबाजी वायमारे (वय ८५) असे जखमींचे नाव आहे. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करून शासकीय रुग्णालयात रवी वायमारे (भाऊ) यांनी दाखल केले. गुरुवारी सायंकाळी हा प्रकार घडला. अशी नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

प्रवीण माने बंडखोरी करणार हर्षवर्धन पाटलांच्या अडचणीत भर

इंदापूर : माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी ऐन विधानसभेपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (शरदचंद्र पवार) प्रवेश केल्यानं पक्षातील निष्ठावंत नाराज झाले होते. हर्षवर्धन पाटील यांना दिलेली उमेदवारी मागे घ्यावी, अन्यथा बंडखोरी अटळ असल्याचा इशारा निष्ठावतांनी परिवर्तन' मेळाव्याच्या माध्यमातून दिला होता. मात्र, ही बंडखोरी राष्ट्रवादी काँग्रेसला रोखता आली नाही. अखेर प्रवीण माने यांनी बंडखोरी केली आहे. जिल्हा परिषदचे माजी बांधकाम आणि आरोग्य सभापती, सोनाई उद्योगसमूहाचे संचालक प्रवीण माने हे २३ ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. माने यांनी अपक्ष अर्ज दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. हा राष्ट्रवादी काँग्रेससाठी (शरद पवार) मोठा धक्का मानला जातोय. प्रवीण माने विधानसभेच्या आखाड्यात आल्यास तिरंगी लढत होऊ शकते. तसेच, हर्षवर्धन पाटील यांच्या अडचणीत वाढ होणार आहे. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रवीण माने यांची समजूत काढण्याचा प्रयत्न होतो का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.

शेळगी ब्रिजवर अनोळखी इसम ठार

सोलापूर : सिद्धेश्वर मार्केट यार्ड ते पुणे नाका मार्गावरील शेळगी ब्रिजवर अनोळखी वाहनाच्या धडकेने ३५ ते ४० वर्षीय अनोळखी इसम गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात गुरुवारी पहाटे ४ वाजेच्या सुमारास घडला.अनोळखी पुरुषाचा मृतदेह पोलीसांनी शासकीय रुग्णालयात उत्तरीय तपासणीसाठी दाखल केला.या अपघाताची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली. हवालदार दुधाळे पुढील तपास करीत आहेत.

गरम पाण्याचे बादली सांडून मुलगी भाजली

यावली (ता.मोहोळ) येथे विजेचा गिझर लावलेली गरम पाण्याची बादली पडल्याने झोपेत असलेली श्रावणी ज्ञानेश्वर राऊत (वय ९ रा.यावली ता.मोहोळ) ही बालिका भाजून जखमी झाली. ही घटना गुरुवारी पहाटेच्या सुमारास घडली. तिला खाजगी रुग्णालयात उपचार करून वडिलांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

आचारसंहितेच्या संकटात सापडलेली जिल्हा परिषद अखेर पडली ओस

ना अधिकारी ना कर्मचारी; परिसरात फक्त शुकशुकट

सोलापूर : विधानसभा निवडणुकीसाठी आचार संहितेच्या संकटात सापडलेली जिल्हा परिषद म्हणजे जिल्ह्याचे मिनी मंत्रालयल आज अखेर ओस पडले आहे. जिल्हा परिषद म्हणजे जिल्ह्याचे मिनी मंत्रालय म्हणून ओळखले जाणाऱ्या जिल्हा परिषदेत कार्यकर्त्यांची व लोकप्रतिनिधींची रोजाना जी हाउसफुल गर्दी असते ती गर्दी आचारसंहिता लागू होतात ओसरली आहे. शुक्रवारी पूर्ण मुख्यालयामध्ये शुकशुकाट दिसून आला.

राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी मंगळवारी आचारसंहिता लागू करण्यात आली. तत्पूर्वी मागील आठ दिवसात जिल्हा परिषदेत विविध विकास कामाला मंजुरी मिळवण्याकरिता लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांची अक्षरशः झुंबड उडाली होती. सोमवारी दिवसभर मंगळवारी दुपारपर्यंत ही जिल्हा परिषदेत कार्यकर्त्यांची मोठी रिघ लागल्याचे दिसून आले. आचारसंहिता लागू झाल्यानंतर जिल्हा परिषदेतील अधिकारी रिलॅक्स झाले. त्यांव्याकडून सुट्टीचे नियोजन सुरू झाले. दुसरीकडे जिल्हा परिषदेतील बहुतांश कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे कामकाज सोपविण्यात आले आहे . जिल्हा नियोजन समिती व राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी नियोजन समिती व राज्य शासनाकडून जिल्हा परिषदेला विकास कामासाठी निधी देण्यात येतो. जिल्हा परिषदेकडे लहान निधी आपल्या मतदारसंघात वापरण्याकरिता आमदार, जिल्हा परिषद सदस्य, सरपंच यांचे शर्तीचे प्रयत्न होतात. आचारसंहिते पूर्वी आपल्या मतदारसंघात निधी खेचून नेण्याकरिता लोकप्रतिनिधींची जिल्हा परिषदेवर मोठी गर्दी झाल्याचे दिसून आली. आता ती गर्दी पूर्णपणे ओसरली आहे. मागील दोन वर्षापासून मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका रखडल्या आहेत. या निवडणुका कधी होणार याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांच्या नजरा लागून राहिल्याचे चित्र संपूर्ण जिल्हाभर दिसून येत आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मागचं विसरुन पुढे जाऊ !!!

कल्याण
230-56-349

मुंबई
290-12-679

मोहोळ विधानसभेसाठी २८ पथकांची नियुक्ती

निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांची माहिती ▶▶ आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन

मोहोळ/प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोहोळ विधानसभा मतदारसंघातील विविध कामकाजासाठी नोडल अधिकारी, स्थिर सर्वेक्षण पथक, व्हीडीओ व्हीव्हींग टिम, फरारी पथक, व्हीडीओ सर्वेक्षण पथक, आचार सहिंता पथक, वाहतूक व्यवस्थापन पथक अश्या २८ पथकांची नियुक्ती करण्यात आली असून या सर्व पथकाचे प्रशिक्षण व आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत. सर्व नागरिकांनी आदर्श आचार संहीतेचे पालन काटेकोर पणे करावे, असे प्रतिपादन निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी केले.

मोहोळ : आढावा बैठकी दरम्यान सूचना करताना सीमा होळकर.

निवडणुकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यापासून आदर्श आचार संहिता लागू झालेली आहे. मोहोळ (अ.जा) विधानसभा मतदार संघामध्ये एकूण मतदान केंद्र ३३६ आहेत. प्रत्येक मतदान केंद्राला एक अधिकारी असे ३३६ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नेमले आहेत. या मतदार संघामध्ये एकही मतदान केंद्रे संवेदनशील नसून,५० टक्के मतदान केंद्रावर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे. विधानसभा मतदार संघासाठी निवडणूक नियंत्रण व समन्वय कक्ष, तहसिल कार्यालय मोहोळ येथे सुरू करण्यात आला आहे.त्यात एक नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आली आहे.तर एक निशुल्क फोन नंबर हा सुध्दा ऍक्टिव्ह करण्यात आला आहे. नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून सर्व पथकांवर नजर ठेवण्यात येणार आहे. तसेच मतदारसंघ सार्वत्रिक निवडणुकीसाठी लागणाऱ्या सर्व परवाने घेण्यासाठी एक खिडकी योजना व सुविधा प्रणालीद्वारे अर्ज सादर करणेची सोय करण्यात आली आहे, असे ही सीमा होळकर यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार सचिन मुळीक, महसूल नायब तहसीलदार सुधाकर धाईंजे ,निवडणूक नायब तहसीलदार अनिल शहापुरे,मंडळ अधिकारी प्रकाश दळवी , अजित वायमोडे निवडणूक महसूल सहाय्यक अजित वायमोडे आदी उपस्थित होते.

३ लाख २६ हजार ७१८ मतदार

मोहोळ विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख २६ हजार ७१८ मतदार आहेत. यात पुरुष १ लाख ७१ हजार १०३ आहे.तर स्त्री मतदार १ लाख ५५ हजार ६०७ इतका आहे. इतर ०८ असे एकूण ३ लाख २६ हजार ७१८ मतदार आहेत. लोकसभेच्या तुलनेत ५ हजार ४८१ मतांची वाढ झाली आहे.

भारत जाधव यांना डॉक्टरेट पदवी जाहीर

सोलापूर : सोलापूरच्या सामाजिक चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते, दलित मित्र भारत जाधव यांना सामाजिक कार्यातील योगदानाबद्दल टोलोसा -मेक्सिको विद्यापीठसल्गन तुतीकोरीन, तामिळनाडू यांच्याकडून मानद डॉक्टरेट जाहीर करण्यात आली आहे. भारत जाधव यांचे सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य असून समाज कल्याणचा अनेक योजनांचा त्यांनी समाजातील तळागाळातील जनतेला लाभ मिळवून दिला आहे. मानद डॉक्टर जाहीर झाल्याबद्दल जाधव यांचे समाजातून सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. पदवीदान समारंभ मौर्या हॉल लातुर येथे २० रोजी संपन्न होणार आहे.